पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/ /२०
पुणे दिनांक :- / /२०२०

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
सुभद्रास एज्युकेशन सोसायटी,पुणे संचलित एस.एन.बी.पी.इंटरनॅशनल स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज,
वाघोली,पुणे.

**विषय**:- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देणेबाबत.

**संदर्भ**:- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४),२०१३.
२. शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-२०१९/प्र.क्र.८८३/एसएम-२ दिनांक-१७.९.२०१९.
३. मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे जा.क्र.शिउसं/प्राथ-२०२/मान्यता/पुवि/२०१-१९/६७४८दि २०.९.२०१९

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा सुरु करण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर विद्यमान शाळा प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ.१ ली ते ८ वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र | संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सुभद्रास एज्युकेशन सोसायटी, पुणे. | एस.एन.बी.पी.इंटरनॅशल स्कूल अँन्ड ज्युनिअर कॉलेज,वाघोली,पुणे. | इंग्रजी | स्वयंअर्थसहाय्यित नविन शाळा (सी.बी.एस.ई.) | नविन प्राथमिक ते उच्च प्राथ.शाळा इ.१ ली ते ८ वी | २०१९-२० |

**अटी व शर्ती**

१) संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्य,शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२) शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३) या अधिनियमातील तरतुदीनुसार वर्ग सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.
४) संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे, परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
५) परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
७) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
८) शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१८/प्र.क्र.६९१/एसएम-२ दिनांक-१८.६.२०१८ तील अटी,शर्तीतील मुद्दा क्र.२ चे पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.
९) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
१०) शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर —**
१) मा.अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३) मा.शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

Scanned with CamScanner